५८५ २७०

वेतन वाढीचा दिनांक मोजण्याची पध्दती.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक - आयएनसी १०८२/सीआर ७७४/एसईआर-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक ३० मार्च १९८४

CR1984033001

## प_रि_प_त्र_क

महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१ मध्ये " महिना " ह्या शब्दाची व्याख्या दिली आहे. ह्याच नियमामध्ये जो काळ महिने व दिवस यामध्ये दर्शविलेला असेल तो कोणत्या पध्दतीने मोजावा याचे स्पष्टीकरणाही दिलेले आहे. ह्याबद्दलचे एक उदाहरणसुध्दा नियम ९ [३४] खालील सूचनेमध्ये दिलेले आहे. तथापि वरीलप्रमाणे कोणताही काळ मोजण्याची पध्दत १५ ऑगस्ट १९८१ पासून अंमलात आलेली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१ अंमलात येण्यापूर्वी एखाद्या शासकीय कर्मचा-याची वरच्या जागेवर रितसर नेमणूक होण्यापूर्वी जर अशा कर्मचा-याने निर-निराळ्या वेळी थोडया काळाकरीता वरच्या जागेवर सेवा बजावली असेल तर त्याच्या बाबतीत वेतनवाढीचा दिनांक मोजण्याकरिता प्रथम महिने व नंतर येणारे दिवस विचारात घेतले जात असत, म्हणजेच २५ जानेवारी १९८३ पासून ३ महिने, २० दिवस मोजण्याकरीता, प्रथम ३ महिने २४ एप्रिल रोजी भरले असे धरून नंतरचे २० दिवस १४ मे रोजी संपले असे खालीलप्रमाणे धरत असत :-

| | | वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|
| २५-१-८३ ते २४-४-८३ | = | ० | ३ | ० |
| २५-४-८३ ते १४-५-८३ | = | ० | ० | २० |
| | | ० | ३ | २० |

वरीलप्रमाणे प्रथम महिने व नंतर दिवस मोजण्याची पध्दती दिनांक १५ ऑगस्ट १९८१ पासून बदलली असून त्याऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१ यांतील नियम ९ [३४] खालील सूचनेत दर्शविलेली नवीन पध्दती सुरु केली आहे. वरील सूचना असूनसुध्दा असे आढळून आले आहे की काही विभाग/कार्यालयानी वेतनवाढीचा दिनांक काढण्याची जूनीच पध्दती चालू ठेवली आहे. हे बरोबर नसल्यामुळे शासन आता असे आदेश देत आहे की १५ ऑगस्ट १९८१ ह्या दिवसापासून पुढे [१५ ऑगस्ट १९८१ हा दिवस धरून] वेतनवाढीची जी प्रकरणे उद्भवतील त्या प्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१ च्या नियम ९ [३४] खालील सूचनेचे वेतनवाढीचा दिनांक काढण्या-करीता पालन करावे.

शासमु•रोटा/वि•वि•/एच-११८१[१०००+५-४-८४]

२. वरील पध्दतीप्रमाणे वेतन वाढीचा दिनांक नक्की कशाप्रकारे मोजावा ते ह्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्रात दाखविलेले आहे.

३. ह्या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

नरेंद्र कर्णिक
शासनाचे अवर सचिव.

सोबत : जोडपत्र

प्रति,

महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशोब, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री आणि राज्य मंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व विभागीय आयुक्त,
* प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ शाखा], मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मंत्रालयीन सर्व विभाग,
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल, वित्त विभाग, एसईआर-३.

* पत्राद्वारे.

शा-११८१[२०००]-५-७-८४]

शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र• आयएनसी १०८२/सीआर-७७४/ एसईआर-३, दिनांक ३० मार्च १९८४ ह्याचे

## जो ड प त्र

उदाहरण :

वरिष्ठ लिपिक म्हणून दिनांक ११ मार्च १९८३ पासून अखंडितपणे स्थानापन्न असलेल्या व रुपये ३३५ इतके वेतन घेत असलेल्या एका शासकीय कर्मचा-याच्या खाती २१ जुलै १९८२ ते १५ सप्टेंबर १९८२ व १९ ऑक्टोबर १९८२ ते १० नोव्हेंबर १९८२ ह्या दोन कालावधीतील वरील वेतन टप्प्यावरचीच खंडित सेवा जमा आहे•

वरील कर्मचा-याचा त्याच वेतन टप्प्यावरील खंडित सेवा धरून वेतन वाढीचा दिनांक खालीलप्रमाणे मोजला जाईल :-

| | वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|---|
| २१-७-८२ ते ३१-७-८२ | ० | ० | ११ |
| ऑगस्ट १९८२ | ० | १ | ० |
| १-९-८२ ते १५-९-८२ | ० | ० | १५ |
| १९-१०-८२ ते ३१-१०-८२ | ० | ० | १३ |
| १-११-८२ ते १०-११-८२ | ० | ० | १० |
| ११-३-८३ ते ३१-३-८३ | ० | ० | २१ |
| एप्रिल, १९८३ ते नोव्हेंबर १९८३ | ० | ८ | ० |
| १-१२-८३ ते २०-१२-८३ | ० | ० | २० |
| | १ | ० | ० |

वेतनवाढीचा पुढील दिनांक २१-१२-१९८३

टीप :- वेतनवाढीचा दिनांक हा महिन्याच्या पहिल्या तारखेस ठरविला जात असल्याने, ह्या ठिकाणी तो १-१२-८३ असा धरावा लागेल, परंतु तो शासकीय कर्मचारी पहिल्या तारखेपासून वेतन वाढीच्या दिनांकापर्यन्त [येथे २१-१२-८३ पर्यन्त] त्या जागेवर प्रत्यक्ष स्थानापन्न असावा•

---

एच-११८१[९०००-५-४-८४]•

Date of Increment - .
Method of counting of the --

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Finance Department,
Circular No.INC-1082/CR-774/SER-3,
Mantralaya, Bombay-400 032, Dated the 30th March 1984.

CIRCULAR

Rule 9(34) of the Maharashtra Civil Services(Pay) Rules, 1981 gives definition of the word "month" and it also clarifies the method of calculating a period expressed in terms of months and days. An example of this is also given in the instruction below rule 9(34). The method of calculating the period as indicated above is, however, effective from 15th August 1981. Prior to the introduction of Maharashtra Civil Services(Pay) Rules, 1981, for calculating the date of increment in case of a Government Servant who has officiated in a higher post for short spells on different occasions before he was regularly appointed in that post, first months and afterwards days were taken into account i.e. in calculating a period of 3 months and 20 days from 25th January 1983, 3 months were taken as ending on 24th April and 20 days on 14th May in the following way :-

| | Y. M. D. |
|---|---|
| 25-1-83 to 24-4-83 | 0-3-0 |
| 25-4-83 to 14-5-83 | 0-0-20 |
| | 0-3-20 |

The method of calculating the period in terms of months and days as clarified above has been done away with, with effect from 15th August 1981 and instead, a revised method of calculating such a period has been introduced as indicated in the instruction below rule 9(34) of the Maharashtra Civil Services(Pay) Rules, 1981. Despite the above instruction it has been noticed that some Departments/Offices continue to adopt the old method of calculating the date of increment. This is, however, not correct. Government is, therefore, pleased to direct that in cases arising on or after 15th August 1981, instruction below rule 9(34) of the Maharashtra Civil Services(Pay) Rules 1981 should be followed while working out the date of increment.

2. How exactly date of increment should be calculated in terms of the above method is shown in the Annexure to this Circular.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M.W. KARNIK,
Under Secretary to Government.

Enclosure :- Accompaniment.

H-1181(9,000+5-4-84)

ACCOMPANIMENT TO GOVERNMENT CIRCULAR, FINANCE DEPARTMENT, NO. INC-1082/CR-774/SER-3, DATED THE 30TH MARCH 1984.

-----

## A N N E X U R E

**Example:-** A Government Servant who is continuously officiating as Senior Clerk with effect from 11th March 1983 and drawing pay @ Rs.335/- has at his credit broken period service in the post of Senior Clerk for the period from 21st July 1982 to 15th September 1982 and from 19th October 1982 to 10th November 1982 on the same stage. His date of increment after taking into account the broken period of service on the same stage will be calculated as under:-

| | Y.M.D. |
|---|---|
| 21- 7-1982 to 31- 7-1982 | 0-0-11 |
| August 1982 | 0-1-0 |
| 1- 9-1982 to 15- 9-1982 | 0-0-15 |
| 19-10-1982 to 31-10-1982 | 0-0-13 |
| 1-11-1982 to 10-11-1982 | 0-0-10 |
| 11- 3-1983 to 31- 3-1983 | 0-0-21 |
| April to November 1983 | 0-8-0 |
| 1-12-1983 to 20-12-1983 | 0-0-20 |
| | 1-0-0 |

The date of next increment will be 21-12-1983.

**NOTE :-** As the date of increment is fixed as 1st of the month, the same will be 1-12-1983 provided the Government servant was holding the post from the first of that month to the date it falls due.